सत्रात विद्यार्थ्यांचे झालेले नुकसान भरून काढणे दूरच, आता दुसऱ्या सत्रात शिक्षकांच्या मानगुटीवर 'जनगणने'चे भूत बसवण्यात आले आहे.डिसेंबर महिन्यात प्रगणक व पर्यवेक्षक प्रशिक्षण, जानेवारी ते फेब्रुवारी प्रत्यक्ष लोकसंख्या गणना, बेघर लोकसंख्या गणनातर मार्च महिन्यात पुनरावृत्तीचा टप्पा असा जनगणना नियोजित कार्यक्रम असणार आहे.

एरवी दिवाळीपूर्वी प्रथम सत्राचे मूल्यमापन होऊन अभ्यासक्रम पुढे जातो. मात्र, यंदा नोव्हेंबर उलटला तरी कामांच्या बोज्यामुळे डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात संकलित मूल्यमापन-१ घ्यावे लागत आहे. त्यानंतर लगेच क्रीडा स्पर्धा, विज्ञान प्रदर्शने आणि पाठोपाठ जनगणनेचे प्रशिक्षण व महिनाभर चालणारी प्रत्यक्ष जनगणना! या चक्रात विद्यार्थ्यांचा अभ्यास कधी घ्यायचा, हा प्रश्न अनुत्तरित आहे.

याशिवाय शासकीय प्रशिक्षणे, कार्यशाळा, लेखापरीक्षणे, आढावा सभा, ची प्रशिक्षणे, जंतनाशक गोळ्या वितरण आणि तंबाखूमुक्त शाळा अभियान यातही शिक्षकांचे शेकडो तास वाया गेले आहेत. शालेय वेळेत अनिवार्य करण्यात आलेली ऑनलाइन कामे आणि प्रशिक्षणांमुळे वर्गात उभे राहून शिकवण्यासाठी शिक्षकांना वेळच शिल्लक राहिलेला नाही.

वर्ग अध्यापन ही सर्वात कमी महत्त्वाची बाब उरली आहे का? असा संतप्त सवाल आता पालक आणि शिक्षणप्रेमी विचारू लागले असून शासनाची सर्व महत्त्वाची कामे शिक्षकांनीच करावीत, पण गुणवत्ता यादीत विद्यार्थी मागे पडल्यावर मात्र शिक्षकांनाच दोषी ठरवले जाते, ही मोठी शोकांतिका आहे. शिक्षण व्यवस्थेचा हा खेळ असाच चालू राहिल्यास भविष्यात विद्यार्थ्यांचे मोठे शैक्षणिक नुकसान अटळ आहे.

जयभवानी चौकात पुन्हा टिपरची कारला धडक!

केज/प्रतिनिधी

केज शहरातील धारूर रोडवरील जयभवानी चौकात अपघातांचे सत्र थांबण्याचे नाव घेत नसून,मंगळवारी सकाळी पुन्हा टिपर आणि कारचा अपघात झाला.रस्ता क्रॉस करण्यासाठी प्रतीक्षेत उभ्या असलेल्या कारला पाठीमागून भरधाव आलेल्या टिपरने जोरदार धडक दिली.या अपघातात कारचे किरकोळ नुकसान झाले असून, सुदैवाने कारचालक थोडक्यात बचावला. कोणतीही जीवितहानी झाली नसल्याने मोठा अनर्थ टळला.या अपघातातील कारचा क्रमांक एम एच २३ बीएच ३१२६ असल्याची माहिती आहे.भवानी चौकात वारंवार अपघात घडत असल्याने हा चौक वाहन धारकांसाठी धोकादायक बनला आहे.यापूर्वीही या ठिकाणी अनेक अपघात झाले असून, काहींना आपला जीव गमवावा लागला आहे. त्यामुळे भवानी



चौक म्हणजे मृत्यूचा सापळा अशी भावना नागरिकां मधून व्यक्त होत आहे.

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन साहेब, आणखी किती बळींची प्रतीक्षा?

धारूर रोडवरील जय भवानी चौकातील वाढते अपघात लक्षात घेता जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी या गंभीर समस्येकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी होत आहे.या चौकाची प्रत्यक्ष पाहणी करून संबंधित विभागामार्फत तांत्रिक तपासणी करावी आणि आवश्यक निकषांनुसार या ठिकाणाला अधिकृत पणे 'ब्लॅक स्पॉट' घोषित करण्यासाठी कार्यवाही करावी, अशी मागणी नागरिकांतून होत आहे. या चौकात गतिरोधक, वाहतूक सिग्नल, दिशादर्शक फलक, रस्त्यावर पांढरे पट्टे, पुरेशी प्रकाश व्यवस्था आणि अवजड वाहनांच्या वेगावर नियंत्रण ठेवण्यासाठी कायम स्वरूपी उपाययोजना करणे गरजेचे आहे. आजच्या अपघातात कारचालक थोडक्यात बचावला; मात्र प्रत्येक वेळी असे नशीब साथ देईलच असे नाही. त्यामुळे आणखी एखादी मोठी दुर्घटना घडण्यापूर्वी प्रशासनाने जागे होऊन जयभवानी चौकातील अपघात रोखण्यासाठी ठोस पावले उचलावीत, अशी मागणी जोर धरत आहे.

शिरूर कासारच्या पावन भूमिवर आवतरला शिवकालीन इतिहास

किल्ला बांधनीतून दुष्काळाची दाहकता बालमनालाही जाणवली,किल्ल्याभवती पाणी टाकण्या ऐवजी घेतला रांगोळीचा आधार

मानूर प्रतिनिधी

दिवाळीच्या सुट्टीत विद्यार्थ्यांच्या हातून शिवकालीन इतिहासाला उजाळा मिळाला; मात्र याच उपक्रमातून शिरूर कासार तालुक्यातील दुष्काळी परिस्थितीचे वास्तवही समोर आले. शिरूर कासार येथील टॅलेन्ट हब कोचिंग क्लासेसच्या ३५० विद्यार्थ्यांनी एकत्र येत सात ऐतिहासिक किल्ल्यांच्या आकर्षक प्रतिकृती साकारल्या. विशेष म्हणजे, विद्यार्थ्यांनी सिंधुदुर्ग किल्ल्याची प्रतिकृती तयार केल्यानंतर त्याभोवती पाणी टाकण्यास सांगितले असता, शिरूर कासार तालुक्यात दुष्काळी परिस्थिती असल्याने पाणी वाया घालवायचे नाही, असे सांगत विद्यार्थ्यांनी पाणी टाकण्या ऐवजी रांगोळीचा आधार घेतला या छोट्याशा प्रसंगातून विद्यार्थ्यांच्या मनातही पाणीटंचाईची जाणीव किती खोलवर रुजली आहे, याचे दर्शन घडले.

दिवाळीच्या सुट्ट्यांचा उपयोग केवळ मौजमजा आणि मनोरंजनासाठी न करता विद्यार्थ्यांमध्ये ऐतिहासिक जाणीव, कलागुण आणि सर्जनशीलता विकसित व्हावी, या उद्देशाने टॅलेन्ट हब कोचिंग क्लासेसच्या वतीने हा अभिनव उपक्रम राबविण्यात आला. सकाळी ठीक ८ वाजता क्लाससमोरील मैदानावर या उपक्रमाला सुरुवात झाली. तब्बल ३५० विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेत आपल्या कलेतून छत्रपती शिवाजी महाराजांच्या इतिहासाची जणू पुनरावृत्तीच सादर केली.

सात किल्ल्यांतून शिवकालीन इतिहासाचे दर्शन

या उपक्रमात विद्यार्थ्यांनी प्रतापगड, जंजिरा, दौलताबाद, पुरंदर, रायगड, सिंधुदुर्ग आणि तोरणा या सात ऐतिहासिक किल्ल्यांच्या आकर्षक प्रतिकृती साकारल्या. किल्ल्यांची तटबंदी, बुरुज आणि विविध ऐतिहासिक रचना साकारताना विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेचा पुरेपूर वापर केला. या माध्यमातून महाराष्ट्राच्या गड-किल्ल्यांचा गौरवशाली इतिहास विद्यार्थ्यांनी आपल्या कलाकृतीतून जिवंत केला.



***किल्ला बांधला; मात्र पाणी टाकण्यास नकार देऊन रांगोळी टाकून पाण्याची प्रतिकृती दाखवली..!**

या उपक्रमातील सर्वाधिक लक्षवेधी प्रसंग सिंधुदुर्ग किल्ल्याच्या निर्मितीदरम्यान घडला. सिंधुदुर्ग किल्ला समुद्राच्या पाण्याने वेढलेला असल्याने त्याच्या प्रतिकृतीभोवती पाणी टाकण्याची सूचना विद्यार्थ्यांना करण्यात आली. मात्र, सध्या शिरूर कासार तालुक्यात दुष्काळी परिस्थिती असून पाण्याचे महत्त्व लक्षात घेता पाणी वाया घालवू नये, असे सांगत विद्यार्थ्यांनी पाणी टाकण्यास नकार दिला. एका बाजूला इतिहासातील समुद्रदुर्गाची प्रतिकृती आणि दुसऱ्या बाजूला आजच्या पाणीटंचाईचे वास्तव, असा भावनिक आणि विचार करायला लावणारा प्रसंग यावेळी पाहायला मिळाला. लहान वयातच विद्यार्थ्यांनी पाण्याचे महत्त्व ओळखून दाखविलेली ही संवेदनशीलता निश्चितच कौतुकास्पद ठरली.

***छत्रपतींचा इतिहास कलेतून साकारला : अमर खोले**

यावेळी टॅलेन्ट हब कोचिंग क्लासेसचे संचालक अमर खोले म्हणाले की, विद्यार्थ्यांना आपल्या गौरवशाली इतिहासाची माहिती व्हावी, छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य आणि महाराष्ट्रातील गड-किल्ल्यांचे महत्त्व समजावे, या हेतूने आज क्लाससमोरील मैदानावर हा उपक्रम आयोजित करण्यात आला. विद्यार्थ्यांनी आपल्या कलेच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराजांच्या इतिहासाची पुनरावृत्ती सादर केली. अभ्यासासोबतच विद्यार्थ्यांना इतिहास, संस्कृती आणि सामाजिक परिस्थितीची जाणीव व्हावी, हाही या उपक्रमामागील उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले.

सहा शिक्षकांचे मार्गदर्शन; विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी अमर खोले, राजकुमार केदार, संदीप सटले, विशाल तांबे, अमोल मोरे आणि ताई नेटके या सहा शिक्षकांनी विशेष परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांना विविध जबाबदाऱ्या देऊन त्यांच्याकडून किल्ल्यांची निर्मिती करून घेण्यात आली. या उपक्रमात राज कांबळे, समृद्धी तुपे, श्रावणी मोरे, अनन्या मोरे, आराध्या गिते, आर्या ढाकणे, आदित्य मोरे, विवेक नागरगोजे, मयूर केदार, राजकुमार मगर, अंजली नेटके, लावण्या मोरे, अर्पिता तुपे, हर्षदा सकुंडे, आकांक्षा खेडकर, मुकेश पवार, ऋषीकेश केदार, शिवराज नेटके, सिद्धार्थ मोरे, स्नेहल सिरसट आणि अर्णव विघ्ने यांच्यासह अनेक विद्यार्थ्यांनी मेहनत घेतली.

***इतिहासाची ओळख आणि पाणी बचतीचा संदेश!**

या उपक्रमातून विद्यार्थ्यांनी एकाच वेळी दोन महत्त्वाचे संदेश दिले. आपल्या ऐतिहासिक वारशाचा अभिमान बाळगावा आणि वर्तमानातील पाणीटंचाईचे गांभीर्य ओळखून प्रत्येक थेंब पाण्याची बचत करावी. दिवाळीच्या सुट्टीत मोबाईल आणि मनोरंजनापलीकडे जाऊन विद्यार्थ्यांनी इतिहास, कला आणि सामाजिक जाणीवेचा सुंदर संगम घडविला. टॅलेन्ट हब कोचिंग क्लासेसचा हा उपक्रम शिरूर कासर परिसरात कौतुकाचा विषय ठरत आहे.

पंचायत समिती कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी रोहित सायकड तर व्हा.चेअरमनपदी बापुराव आंधळे यांची अविरोध निवड

आष्टी / (एस.राजेंद्र लाड)

आष्टी येथील पंचायत समिती कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या. आष्टीच्या चेअरमनपदी रोहित सायकड, तर व्हाईस चेअरमनपदी बापुराव आंधळे यांची अविरोध निवड करण्यात आली आहे. या निवडीमुळे संस्थेच्या पदाधिकारी व सभासदांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

पंचायत समिती कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या. आष्टी ही कर्मचारी सभासदांच्या आर्थिक हितासाठी कार्यरत असलेली संस्था आहे. संस्थेच्या चेअरमन व व्हाईस



चेअरमन पदाच्या निवडीची प्रक्रिया पार पडली. यामध्ये चेअरमनपदासाठी रोहित सायकड, तर व्हाईस चेअरमनपदासाठी बापुराव आंधळे यांची कोणताही विरोध न होता अविरोध निवड करण्यात आली. या निवडीनंतर नवनिर्वाचित चेअरमन रोहित सायकड आणि व्हाईस चेअरमन बापुराव आंधळे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. संस्थेच्या प्रगतीसाठी, सभासदांच्या हितासाठी तसेच संस्थेचा कारभार अधिक पारदर्शक व गतिमान करण्यासाठी नवनिर्वाचित पदाधिकारी योगदान देतील, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात येत आहे.

या निवडीबद्दल अस्लम बेग, अर्शद शेख, भाऊसाहेब कावदार, भाऊसाहेब मस्के, सारिका शहाणे, राणी निकम, रूपाली भागवत (कार्यलक्षी संचालिका), लक्ष्मण निकाळजे, सतीष मासाळकर, विलास सोनवणे (सचिव) तसेच संस्थेच्या सर्व सभासद बंधू-भगिनींनी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या. पंचायत समिती कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या या अविरोध निवडीमुळे संस्थेच्या आगामी वाटचालीला नवी दिशा मिळेल, असा विश्वास सभासदांनी व्यक्त केला आहे.

महात्मा जोतीराव फुले यांच्या द्विशताब्दी वर्षानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करावे विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर (विमाका)

भारतातील सामाजिक क्रांतीचे अग्रदूत, थोर समाजसुधारक आणि शिक्षण-तज्ज्ञ महात्मा जोतीराव फुले यांच्या २०० व्या जयंतीनिमित्त सन २०२७ हे द्विशताब्दी वर्ष साजरे करण्यात येत आहे. या निमित्ताने महात्मा जोतीराव फुले यांचे सामाजिक समता, स्त्रीशिक्षण, शेतकरी कल्याण, सामाजिक न्याय आणि मानवमुक्तीविषयक विचार समाजातील सर्व घटकांपर्यंत पोहोचविण्यासाठी छत्रपती संभाजीनगर विभागातील सर्व शासकीय विभागांनी आपापल्या स्तरावर वर्षभर विविध उपक्रम व कार्यक्रमांचे आयोजन करावे, असे आवाहन विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी केले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने १० एप्रिल २०२६ रोजी जारी केलेल्या शासन परिपत्रकानुसार, दि. ११ एप्रिल २०२६ ते १० एप्रिल २०२७ या कालावधीत महात्मा जोतीराव फुले यांचे द्विशताब्दी वर्ष विविध उपक्रमांनी साजरे करण्यात येणार आहे. राज्य शासनाने यासाठी महिनानिहाय कृती आराखडाही निश्चित केला आहे. या आराखड्याच्या अनुषंगाने केवळ शैक्षणिक संस्थांपुरते कार्यक्रम मर्यादित न ठेवता सर्व विभागांनी आपल्या कार्यक्षेत्रात जनजागृतीपर उपक्रम राबवून या महापुरुषांचे विचार समाजाच्या घराघरात पोहोचवावेत, असे विभागीय आयुक्तांनी म्हटले आहे.

या उपक्रमांच्या प्रभावी प्रसिद्धीसाठी प्रत्येक जिल्ह्यातील जिल्हा माहिती अधिकारी यांचे सहकार्य घ्यावे. संबंधित विभागांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमांची



माहिती, छायाचित्रे आणि वृत्त जिल्हा माहिती कार्यालयामार्फत प्रसारित करावे. वृत्तपत्रे, दूरचित्रवाणी, समाजमाध्यमे तसेच अन्य उपलब्ध प्रसिद्धी माध्यमांचा प्रभावी वापर करून महात्मा जोतीराव फुले यांच्या कार्याची व्यापक जनजागृती करावी, असेही आवाहन त्यांनी केले आहे.राज्य शासनाच्या कृती आराखड्यानुसार जागृती रॅली, भित्तिपत्रक अभियान, जीवनपरिचय सप्ताह, जलसंवर्धन, शेतकरी व जलव्यवस्थापनविषयक उपक्रम, बालसभा आणि स्वच्छता अभियान; सामाजिक समता कथा, चर्चा, ग्रामभेट, समता भिंत आणि समता दौड; वृक्षारोपण, देशभक्तीपर गीत कार्यक्रम, वक्तृत्व स्पर्धा, प्रश्नमंजुषा, महात्मा फुले साहित्य वाचन अभियान ,शिक्षक गौरव, नवोपक्रम स्पर्धा, विज्ञान व माहिती-तंत्रज्ञानावर आधारित उपक्रम; स्त्री सक्षमीकरण, भूमिका अभिनय, पोस्टर स्पर्धा, पुस्तक प्रदर्शन आणि महात्मा फुले शैक्षणिक प्रेरणा सप्ताह, संविधानविषयक पुस्तकांचे वाचन, अभिरूप ग्रामपंचायत व जिल्हा परिषद उपक्रम, पोवाडा स्पर्धा,जनजागृती रॅली,सांस्कृतिक महोत्सव, चित्रकला स्पर्धा, संशोधन, स्थानिक इतिहासाचा अभ्यास, मुलाखती व प्रकल्प सादरीकरण; वादविवाद, निबंध, पोस्टरनिर्मिती आणि प्रकल्प सादरीकरण स्पर्धा; तर मार्चमध्ये समारोप कार्यक्रम, पुरस्कार वितरण, सामाजिक कार्यकर्ते, विद्यार्थी व शिक्षकांचा विशेष सन्मान,अशा विविध उपक्रमांचा समावेश आहे.या सर्व उपक्रमांमध्ये सामाजिक समता, स्त्रीशिक्षण, शिक्षणाचे महत्त्व, शेतकरी कल्याण, सामाजिक न्याय, संविधानिक मूल्ये आणि वैज्ञानिक दृष्टिकोन या विचारांना प्राधान्य देण्यात यावे. विविध विभागांनी त्यांच्या कामकाजाच्या स्वरूपानुसार व्याख्याने, परिसंवाद, चर्चासत्रे, प्रदर्शन, जनजागृती मोहिमा आणि प्रबोधनात्मक कार्यक्रम आयोजित करावेत. तसेच शासनाच्या निर्देशानुसार कार्यक्रमांचे नियोजन करून त्यांची प्रभावी अंमलबजावणी करावी, असेही विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी स्पष्ट केले आहे.

छत्रपती संभाजीनगर विभागातील छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी आणि हिंगोली या आठही जिल्ह्यांतील सर्व शासकीय यंत्रणांनी या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवावा. महात्मा जोतीराव फुले यांनी आपल्या कार्यातून दिलेला समता, शिक्षण आणि सामाजिक परिवर्तनाचा संदेश नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे, असे आवाहन विभागीय आयुक्तांनी केले आहे.

जामखेडच्या डॉ. आरती जाधव यांना BAMS पदवी प्रदान

जामखेड, विलास बा. जाधव : अंबड तालुक्यातील जामखेड येथील डॉ. आरती किशोर जाधव यांनी वैद्यकीय क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केले आहे. मुंबई येथील प्रसिद्ध आर. ए. पोदार आयुर्वेद वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या ८० व्या पदवीप्रदान समारंभात २८ ऑक्टोबर २०२६ रोजी त्यांना बॅचलर ऑफ आयुर्वेदिक मेडिसिन अँड सर्जरी () ही पदवी प्रदान करण्यात आली.

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ (), नाशिक यांच्या अंतर्गत सन २०२० मध्ये वैद्यकीय शिक्षणासाठी प्रवेश घेतलेल्या डॉ.



आरती जाधव यांनी साडे पाच वर्षांचा शैक्षणिक प्रवास यशस्वीरीत्या पूर्ण केला. मुंबईतील आर. ए. पोदार आयुर्वेद महाविद्यालयात त्यांनी आपले वैद्यकीय शिक्षण पूर्ण केले.

डॉ. आरती जाधव या किशोर जाधव व गयाबाई जाधव यांच्या कन्या आहेत. प्रतिकूल परिस्थितीवर मात करत जिद्द, मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर त्यांनी डॉक्टर होण्याचे स्वप्न साकार केले. आयुर्वेदाच्या माध्यमातून समाजातील गरजू रुग्णांना आरोग्यसेवा देण्याचा त्यांचा मानस आहे.

त्यांच्या या यशामुळे जामखेडच्या शैक्षणिक व वैद्यकीय क्षेत्राच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. या यशाबद्दल तुकाराम सांगुळे, बापुराव धुळे , विलास बा. जाधव (पत्रकार), भाऊसाहेब सांगुळे, दत्ता बनकर व शिवाजी सांगुळे , ज्ञानेश्वर सांगुळे , अनिल जाधव (भाऊ) अंजली जाधव (बहिण), यांनी डॉ. आरती जाधव यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

दैनिक समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
बीड (महाराष्ट्र)
BEED (MAHARASHTRA)
विविध वृत्त
बुधवार दि. ०४ नोव्हेंबर २०२६
Wednesday, Dt. 04 November 2026
पान -४
PAGE - 4

शेळ्या-मेंढ्यांच्या कळपासह मेंढपाळांनी रोखला पालकमंत्र्यांचा ताफा; पंकजाताई मुंडे यांच्याकडे व्यथा मांडत मदतीची भावनिक साद!



बदनापूर प्रतिनिधी-: दुष्काळी परिस्थितीमुळे शेळ्या-मेंढ्यांसाठी चारा-पाण्याचा प्रश्न गंभीर बनला असून, मेंढपाळांना आपल्या पशुधनासह भटकंती करावी लागत आहे. या समस्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी कडेगाव-गेवराई फाटा येथे मेंढपाळांनी शेळ्या-मेंढ्यांच्या कळपासह पशुसंवर्धन मंत्री तथा पालकमंत्री श्रीमती पंकजाताई मुंडे यांच्या ताफ्याला थांबवून निवेदन सादर केले.

छत्रपती संभाजीनगरकडे जात असताना मेंढपाळांनी आपल्या पशुधनासह पालकमंत्र्यांची भेट घेतली. यावेळी दुष्काळी परिस्थिती, शेळ्या-मेंढ्यांसाठी चारा व पाण्याची टंचाई, पशुधनासह करावी लागणारी भटकंती, तसेच मेंढपाळांच्या विविध प्रलंबित समस्यांबाबत सविस्तर व्यथा मांडण्यात आल्या.

''शेतकऱ्यांना शासनाकडून मदत मिळत आहे, त्याचप्रमाणे आमच्या मेंढपाळ समाजाचाही विचार करा. आमच्या पशुधनाला जगवण्यासाठी चारा-पाण्याची व्यवस्था करा. ताई, तुम्हीच आमच्या खऱ्या पालक आहात,'' अशा भावनिक शब्दांत मेंढपाळांनी पंकजाताई मुंडे यांच्याकडे मदतीची विनंती केली.

यावेळी मेंढपाळांच्या वतीने दुष्काळी परिस्थितीत शेळ्या-मेंढ्यांसाठी तातडीने चारा व पाणी उपलब्ध करून देणे, मेंढपाळांना आर्थिक मदत देणे, पशुधनाची अधिकृत गणना करणे तसेच मेंढपाळांच्या समस्यांसाठी विशेष उपाययोजना राबविण्याची मागणी करण्यात आली.

या मागणीसाठी पुढाकार घेणारे समाजाचे कार्यकर्ते गणेश कोल्हे, प्रभाकर जोशी, जनार्दन सोरमारे, धनराज सातपुते, संतोष जोशी, नारायण रिठे, विलास कोल्हे, सुधीर पवार, ज्ञानेश्वर भाऊसाहेब कोल्हे, संभाजी चांगुलपाये, निवृत्ती खरात, सुभाष खरात, दिगंबर कोरडे, देविदास कोरडे, विष्णू डवणे, नवनाथ पाचे, माऊली बुचडे, माऊली नारळे, रेणुकादास कोल्हे आदींसह शेकडो मेंढपाळ उपस्थित होते.

दुष्काळाच्या संकटात शेतकऱ्यांप्रमाणेच मेंढपाळांच्याही पशुधनाचा आणि उदरनिर्वाहाचा प्रश्न गंभीर बनला असून, शासनाने मेंढपाळ समाजाच्या मागण्यांकडे तातडीने लक्ष देऊन ठोस मदत करावी, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.

जालनाई सिल्क ब्रॅन्ड इंडस्ट्रीज कंपनीचे पालक मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते भव्य उद्घाटन



बदनापूर प्रतिनिधी-संजयभुजाळजालना जिल्ह्याच्या दौऱ्याची सुरवात वरूडी जि. जालना येथील शिंदे सिल्क इंडस्ट्रीज या रेशीम सिल्क साडी उत्पादक उद्योगाला भेट देऊन केली. प्रकल्पात काम करणाऱ्या हातमाग महिला कारागिरांची कलाकुसर वाखाणण्याजोगी होती, त्यांचे काम पाहून त्यांना प्रोत्साहन दिले.

जालनाई सिल्क ब्रॅन्ड वरुडी, ता. बदनापूर येथील शिंदे यांच्या सिल्क इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री मा. ना. श्रीमती पंकजाताई मुंडे यांच्या शुभहस्ते संपन्न झाले.

यावेळी त्यांनी कंपनीच्या कामकाजाची तसेच सुरू असलेल्या औद्योगिक उपक्रमांची सविस्तर माहिती जाणून घेतली.

याप्रसंगी शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे, हरिचंद बाबा शिंदे, भगवान बारगजे, भगवान मात्रे, सरपंच राधाकिसन शिंदे यांच्यासह स्थानिक ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ग्रामीण भागातील औद्योगिक विकासाला चालना देणारा हा उपक्रम निश्चितच महत्त्वपूर्ण ठरणार आहे. (माझ्या गावातील उद्योगात आज नवीन सुरुवात पहिले मेडिकल कॉलेज मदर दूध डेरी रेशीम उद्योग वीट उद्योग आणि आता सिल्क साडी ग्रामीण भागात वरुडी या गावात सर्वात जास्त उद्योग चालत असल्यामुळे स्थानिकांना मोठ्या प्रमाणावर रोजगार मिळतो)

राष्ट्रसंत भगवान बाबा मंदिराच्या रंगरंगोटी कामाचा प्रारंभ; शिवसेना जिल्हाप्रमुख रत्नाकर आप्पा शिंदे यांनी पाळला दिलेला शब्द

केज/प्रतिनिधी

शिक्षक कॉलनी,केज येथील राष्ट्रसंत भगवान बाबा मंदिरात सध्या अखंड हरिनाम सप्ताह मोठ्या उत्साहात पार पडत आहे.या सप्ताहाच्या निमित्ताने भाविकांना दिलेला शब्द पाळत, बीड जिल्हा शिवसेना जिल्हाप्रमुख रत्नाकर आप्पा शिंदे यांच्या वतीने मंदिराच्या रंगरंगोटीच्या (कलर) कामाला मंगळवार दि. ३ नोव्हेंबर रोजी प्रत्यक्ष सुरुवात करण्यात आली आहे.शिक्षक कॉलनी परिसरातील राष्ट्रसंत भगवान बाबा मंदिरामध्ये ३१ ऑक्टोबरपासून अखंड हरिनाम सप्ताहाचा प्रारंभ झाला आहे.या सोहळ्या दरम्यान शिवसेना जिल्हाप्रमुख रत्नाकर आप्पा शिंदे यांनी ह.भ.प.अर्जुन महाराज लाड, श्रीराम विडेकर गुरुजी,केशव शास्त्री महाराज,गटनेते हारूनभाई इनामदार, बाबासाहेब केदार सर, प्रकाश मुंडे,स्वातीताई भोसले आणि उपस्थित सर्व भाविक-भक्तांच्या समक्ष मंदिराच्या आकर्षक कलर, रंगरंगोटीचा संकल्प जाहीर केला होता.



आपला हा संकल्प आणि दिलेला शब्द तंतोतंत पाळत दि.३ नोव्हेंबर मंगळवारी प्रत्यक्ष कामास सुरुवात करण्यात आली आहे.अखंड हरिनाम सप्ताहाच्या काळातच मंदिराला हे आकर्षक रूप प्राप्त होणार असल्याने, शिक्षक कॉलनी परिसरातील नागरिक व सप्ताहातील सर्व भाविक-भक्तांकडून रत्नाकर आप्पा शिंदे यांचे मनःपूर्वक आभार मानले जात असून त्यांच्या या कार्याचे कौतुक होत आहे.

मेनरोड डांबरीकरणाचे काम वेगाने सुरू! अतिक्रमण आणि विद्युत खांब देखील हटवले!

नागरिकांसह व्यापारी वर्गाला मिळाला दिलासा! आ.सुरेश धस यांनी घेतले मनावर आणि कामाला मिळाली गती!

मानूर प्रतिनिधी

शिरूर कासार शहराच्या मुख्य रस्त्यावरील डांबरीकरणाच्या कामाची शनिवारी जिजामाता चौक ते छत्रपती संभाजी चौकापर्यंतच्या कामाला सुरूवात झाली असुन धुळीपासुन मुक्ती मिळणार असल्याने नागरिकांसह व्यापारी वर्गात समाधान व्यक्त केले जात असुन आष्टी पाटोदा शिरूरचे आमदार सुरेश धस यांनी या प्रश्नाकडे प्राधान्याने लक्ष दिल्याने कामाला गती मिळाली आहे. नगरपंचायतने दुतर्फा असलेले अतिक्रमण हटवले त्याचबरोबर विद्युत खांब देखील नाल्याच्या कडेला नेले.

साधारणपणे पंधरा वर्षापुर्वी झालेल्या रस्त्याची अवस्था अत्यंत दयनीय झाली होती , रस्त्यावर खड्डे आणि धुळीमुळे त्रासुन गेलेल्या नागरिकाकडून रस्ता दुरूस्तीची मागणी सतत होत असतांना परिस्थितीचे गांभिर्य ओळखुन व नागरिकांच्या आरोग्याला ठेच पोहचण्याची शक्यता लक्षात घेऊन आ. सुरेश धस यांनी हा प्रश्न तातडीने मार्गी लावला .

नगरपंचायतचे मुख्याधिकारी यांनी रस्त्याचे दुतर्फी झालेले अतिक्रमण स्वतः उभे राहून हटवले तसेच विद्युत खांब देखील नाल्याच्या कडेला नेल्याने रस्ता रूंद दिसू लागला, पुन्हा कुणीही अतिक्रमण करू नये असे आवाहन गणेश दहिफळे यांनी केले आहे.

शनिवारी जिजामाता चौकात गटनेते गणेश भांडेकर सार्वजनिक बांधकाम खात्याचे कार्यकारी अभियंता कृष्णा पानसंबळ सह नागरिकांच्या उपस्थितीत डांबरीकरणाचा प्रारंभ झाला.

पालखी मार्गाकडे लक्ष वेधले!

हे काम सुरू झाले तसेच सिंदफना नदी ते जिजामाता चौक या पालखी मार्गाचे देखील काम तातडीने होण्यासाठी कार्यकारी अभियंता पानसंबळ यांचे लक्ष वेधले असता या कामासाठी देखील आ. सुरेश धस यांना विनंती करून हे काम सुरू करण्यात येईल असे पानसंबळ यांनी सांगितले.



युवा नेते जयदत्त भैय्या धस व सागर आप्पा धस यांच्या वाढदिवसानिमित्त गव्हर्मेंट कॉन्ट्रॅक्टर परिवंत गायकवाड यांचा सामाजिक उपक्रम

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना करणार मदत

आष्टी (एस.राजेंद्र लाड)

युवा नेतृत्व म्हणून ओळख असलेले मा. जयदत्त भैय्या धस यांचा बुधवार, दिनांक ४ नोव्हेंबर २०२६ रोजी, तर मा. सागर आप्पा धस यांचा गुरुवार, दिनांक ५ नोव्हेंबर २०२६ रोजी वाढदिवस साजरा होत आहे. या दोन्ही युवा नेतृत्वांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून गव्हर्मेंट कॉन्ट्रॅक्टर तथा कडा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक आणि कऱ्हेवडगावचे सरपंच परिवंत गायकवाड यांनी सामाजिक बांधिलकी जपत दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदत करण्याचा संकल्प केला आहे. लोकनेते, मराठवाडा भूषण आ. सुरेश (आण्णा) धस यांच्या मार्गदर्शनाखाली हा सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार आहे.



जयदत्त भैय्या धस आणि सागर आप्पा धस हे युवा पिढीतील महत्त्वाचे व्यक्तिमत्त्व असून सामाजिक, राजकीय आणि सार्वजनिक जीवनात युवकांना प्रेरणा देणारे नेतृत्व म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. त्यांच्या वाढदिवसानिमित्त केवळ शुभेच्छांचा वर्षाव न करता समाजातील गरजू घटकांना मदतीचा हात देण्याचा उपक्रम गव्हर्मेंट कॉन्ट्रॅक्टर परिवंत गायकवाड यांनी हाती घेतला आहे. विशेषतः दुष्काळी परिस्थितीमुळे अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना मदत करून त्यांच्या संकटात सहभागी होण्याचा हा स्तुत्य प्रयत्न ठरणार आहे.

वाढदिवस हा केवळ आनंदोत्सव साजरा करण्याचा दिवस नसून समाजाप्रती असलेली आपली जबाबदारी आणि बांधिलकी जपण्याची संधी असते. याच भावनेतून गायकवाड यांनी दोन्ही युवा नेतृत्वांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून शेतकऱ्यांच्या मदतीचा संकल्प केला आहे. त्यांच्या या उपक्रमातून सामाजिक संवेदनशीलता आणि माणुसकीचा प्रत्यय येत आहे.

या दोन्ही युवा नेतृत्वांना उत्तम आरोग्य, निरोगी व दीर्घायुष्य लाभावे, त्यांच्या हातून समाजहिताची आणि जनसेवेची अधिकाधिक कार्ये घडावीत, त्यांनी यशाची नवनवी शिखरे सर करावीत आणि सर्वसामान्यांच्या सुख-दुःखात सदैव सहभागी व्हावे, अशा सदिच्छा गव्हर्नमेंट कॉन्ट्रॅक्टर परिवंत गायकवाड यांनी व्यक्त केल्या आहेत.

या निमित्ताने लोकनेते आ. सुरेश (आण्णा) धस मित्र मंडळ, कऱ्हेवडगाव यांच्या वतीनेही मा. जयदत्त भैय्या धस आणि मा. सागर आप्पा धस यांना वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा देण्यात येत आहेत. तसेच गायकवाड परिवार आणि जयदीप कन्स्ट्रक्शनच्या वतीने दोघांच्या पुढील वाटचालीसाठी सुख, समृद्धी, उत्तम आरोग्य आणि उज्ज्वल भविष्याच्या शुभेच्छा व्यक्त करण्यात आल्या आहेत. वाढदिवसाच्या आनंदाला सामाजिक कार्याची जोड देत दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी पुढाकार घेणारे गव्हर्नमेंट कॉन्ट्रॅक्टर परिवंत गायकवाड यांचा हा उपक्रम परिसरात कौतुकाचा विषय ठरत आहे.

परळीच्या जलकन्यांची विभागीय जलतरण स्पर्धेत सुवर्णभरारी! राज्यस्तरावर मारली धडक; पदकांची लयलूट

परळी वैजनाथ (प्रतिनिधी) :

शालेय क्रीडा क्षेत्रात परळीच्या जलकन्यांनी पुन्हा एकदा आपल्या गुणवत्तेचा आणि मेहनतीचा ठसा उमटवला आहे. दिनांक ३ नोव्हेंबर २०२६ रोजी छत्रपती संभाजी नगर येथे पार पडलेल्या शालेय विभागस्तरीय जलतरण स्पर्धेत राजनंदनी चाटे, सिद्धी चाटे आणि आर्या वेरुळे या तीन खेळाडूंनी नेत्रदीपक कामगिरी करत पदकांची अक्षरशः लयलूट केली. विशेष म्हणजे, तिन्ही खेळाडूंनी आपल्या उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर आगामी राज्यस्तरीय शालेय जलतरण स्पर्धेसाठी दिमाखात पात्रता मिळवली आहे. त्यामुळे परळीच्या क्रीडा क्षेत्रात आनंदाचे आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

राजनंदनी प्रकाश चाटे विद्यावर्धिनी विद्यालय परळी अंडर-१७ गटात चमकदार कामगिरी!

अंडर-१७ मुलींच्या गटात राजनंदनी चाटे हिने आपल्या वेगवान पोहण्याच्या जोरावर तीन पदकांची कमाई केली. ५० मीटर फ्री स्टाईलमध्ये द्वितीय क्रमांक पटकावत रौप्यपदक मिळवले, तर २०० मीटर आणि ४०० मीटर फ्री स्टाईलमध्ये प्रथम क्रमांक मिळवत दोन सुवर्णपदकांवर आपले नाव कोरले.

सिद्धी लक्ष्मीकांत चाटे विवेक वर्धिनी विद्यालय परळी ब्रेस्टस्ट्रोकमध्ये सुवर्णभरारी!

अंडर-१४ गटात सिद्धी चाटे हिने आपल्या उत्कृष्ट स्ट्रोक्स आणि जिद्दीच्या जोरावर उल्लेखनीय यश संपादन केले. १०० मीटर फ्री स्टाईलमध्ये द्वितीय क्रमांक मिळवत रौप्यपदक पटकावले, तर १०० मीटर आणि २०० मीटर ब्रेस्टस्ट्रोकमध्ये प्रथम क्रमांक मिळवत दोन सुवर्णपदकांची कमाई केली. ब्रेस्टस्ट्रोक प्रकारातील तिचे वर्चस्व लक्षवेधी ठरले.



आर्या वैजनाथ वेरुळे भेल सेकंडरी स्कूल परळी अंडर-१४ गटात पदकांची कमाई!

अंडर-१४ गटातील आर्या वेरुळे हिनेही आपल्या दमदार कामगिरीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. ५० मीटर बटरफ्लायमध्ये द्वितीय क्रमांक मिळवत रौप्यपदक पटकावले, तर १०० मीटर आणि ४०० मीटर फ्री स्टाईलमध्ये प्रथम क्रमांक मिळवत दोन सुवर्णपदकांवर आपले नाव कोरले.

तीन जलकन्या, सहा सुवर्णपदके आणि तीन रौप्यपदके!

या विभागीय स्पर्धेत परळीच्या तिन्ही खेळाडूंनी मिळून एकूण सहा सुवर्णपदके आणि तीन रौप्यपदके अशी घवघवीत पदकांची कमाई केली. प्रत्येक खेळाडूने आपल्या वयोगटात वेगवेगळ्या जलतरण प्रकारांत उत्कृष्ट कामगिरी करत परळीच्या क्रीडा वैभवात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे.

आता राज्यस्तरीय स्पर्धेत परळीच्या कामगिरीकडे लक्ष!

जिल्हास्तरीय स्पर्धेतील यशानंतर विभागीय स्तरावरही आपले वर्चस्व सिद्ध करत या तिन्ही जलकन्यांनी राज्यस्तरीय स्पर्धेपर्यंत मजल मारली आहे. त्यांच्या या यशामागे नियमित सराव, कठोर मेहनत, शिस्त, प्रशिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचे प्रोत्साहन यांचा मोलाचा वाटा आहे.

परळीतील या तिन्ही उदयोन्मुख जलतरणपटूंच्या यशामुळे शहराच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, आगामी राज्यस्तरीय स्पर्धेतही त्या पदकांची कमाई करून परळीचा नावलौकिक उंचावतील, अशी अपेक्षा क्रीडाप्रेमींकडून व्यक्त होत आहे.

परळीच्या या तीन जलकन्यांच्या यशाचे सर्वत्र कौतुक होत असून, त्यांच्या पुढील क्रीडा वाटचालीसाठी अभिनंदनाचा आणि शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 (MAHARSHTRA).